नि.फौ. प्र. क्र. – ९८६/२०१६
सरकार वि. विजय
**निशाणी क्र. १८**

**<u>सरकार तर्फे साक्षीदार क्र. २ यांचा शपथेवर जबाब</u>**

**<u>सत्यप्रतिज्ञेवर कथन करतो की,</u>**

| | | |
|---|---|---|
| **माझे नाव** | – | भोजराज अशोकरावजी राऊत, |
| **वय** | – | ३३ वर्ष, धंदा – मजूरी, |
| **राहणार** | – | पुसला, ता.– वरुड, जि.– अमरावती |

---

**<u>सरकारतर्फे सरतपास श्री. एम. ए. यावले, सरकारी वकीलांतर्फे</u>**

**१.** मी आरोपीला ओळखतो. आरोपी आज न्यायालयात हजर आहे. घटना काय घडली हे मला माहीत नाही. माझ्या कडे यामाहा गाडी होती. आता मला त्याचा क्रमांक माहीत नाही. सदर गाडी मी पोलीस स्टेशनला अपघात झाल्यामुळे जमा केली होती. अपघात १० वर्षांपुर्वी झाला होता. तो अपघात कुठे झाला हे मला माहीत नाही. त्यावेळी मी गावात नव्हतो. सदर अपघातामध्ये कोणाकोणाला लागले होते हे मला माहीत नाही. पोलीसांनी माझी चौकशी केली नाही. पोलीसांनी माझे बयान नोंदविले नाही. लोकेश माझे मानलेले काका आहे. सदर गाडी मी लोकेश यांचे कडून घेतली होती.

**<u>साक्षीदाराने अभियोग पक्षाला पाठींबा दिला नाही त्यामूळे सरकारी वकीलांनी साक्षीदाराला उत्तरसुचक प्रश्न विचारण्याची परवानगी मागितली–परवानगी मंजूर.</u>**

२. हे म्हणणे खरे आहे की, सन २०१६ मध्ये एम एच –२७/ ए बी – १६८३ ही गाडी नातेवाईक लोकेश यांची होती व ती मी विकत घेतली होती. ती गाडी मी माझ्या नावावर केली नव्हती. हे म्हणणे खरे नाही की, दिनांक १०/०३/२०१६ रोजी मी व माझा मित्र विजय काळे व आरोपी अमोल येथे सालबर्डी यात्रेत गेलो होतो. माझी गाडी विजय चालवित होता. हे मला माहीत नाही की, धनोडी फाटयाजवळ विजयने एका मानसाला उडविले होते. हे मला माहीत नाही

की, त्यामुळे त्या मानसाला लागले होते. हे मला माहीत नाही की, विजय आणि त्या इसमाला दवाखान्यात नेले होते. हे मला माहीत नाही की, अपघात विजयच्या चुकीमुळे घडला होता. हे मला माहीत नाही की, त्या जखमी इसमाचे नाव अमिलाल धुर्वे असे होते. आता मला माझ्या बयानातील अधोरेखांकित भाग 'अ' वाचुन दाखविला. तो बरोबर नाही. पोलीसांनी तो माझ्या बयानात का लिहीला याचे कारण मी सांगु शकत नाही. हे म्हणणे खरे नाही की, विजय माझा मित्र असल्याने त्याला वाचविण्याकरीता मी आज खोटी साक्ष देत आहे.

**उलटतपास आरोपी तर्फे श्री. एस. एच. गाडगे विधीज्ञ**

**उलटतपास – नाकारला.**

**फेरतपास – नाही**

वा.दा.ब.अ.क.केले

THAKARE ISHWAR JAMSING

Digitally signed by THAKARE ISHWAR JAMSING
Location: CJJD & JMFC, WARUD
Date: 2026.02.07 17:00:38 +0530

**(आय. जे. ठाकरे)**

दिनांक : ०७/०२/२०२६

न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग,
न्यायालय क्र. १,वरुड.